जा.क्र.नांवाशमनपा/नसका/सिआर-03/2021
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.
दिनांक:- 19.05.2021

## नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.

## सर्वसाधारण सभेची सूचना

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे अनसूची ``ड`` चे प्रकरण-2 मधील नियम क्रं. 1 अन्वये

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे अनुसूची (ड) चे प्रकरण-2 मधील नियम क्रं 1 अन्वये प्राप्त अधिकारानुसार **मा. महापौर, सौ. मोहीनी विजय येवनकर,** यांनी नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेची सर्व साधारण सभा **दिनांक 27.05.2021 रोजी सकाळी 11.00 वाजता ONLINE द्वारे आयोजीत केली आहे.**

करिता विनंती की, प्रस्तावित सभेस निर्धारीत समयी **ONLINE** सभेस उपस्थित राहून सहकार्य करावे.

**स्वाक्षरीत/-**

**(मा. महापौर यांच्या मान्यतेने)**

**(स. अजीतपालसिंघ संधु)**
**नगरसचिव**
**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड**

**प्रति**
**श्री/श्रीमती --------------------------------**
**सदस्य /सदस्या,**
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

## आयुक्त यांच्याकडून प्राप्त कार्यालयीन प्रस्ताव

**विषय क्रं. 01**

**विषय** :- खडकपुरा भागातील दुलहेशाह रहेमान दर्गाह येथील कब्रस्तानची जागा विस्तारीत करणे बाबत.

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीतील प्रभाग क्रं. 18 मध्ये खडकपुरा भागातील दुलेहशाह रहेमान दर्गाह येथील अस्तित्वातील 03 एका इनामी जमिनीवर मुस्लीम बांधवाच्या कब्रस्तान (दफनभुमी) साठी सदर जागेचा उपयोग करण्यात येत आहे.

तसेच सध्या नांदेडशहरात कोरोनामुळे मृत्यु होण्याचा प्रादुर्भाव वाढत असल्यामुळे दुलेहशाह रहेमान दर्गाह येथील अस्तित्वातील 03 एकर कब्रस्तनाची जागा दफनभुमीसाठी कमी पडत असल्याने सदर कब्रस्तानच्या शेजारी असलेली जागा सर्व्हे नं. 36 वजिराबाद येथील 03 एकर जागा वक्फ बोर्डाची असल्याने सदरची जागा दुलेहशाह रहेमान नगरच्या कब्रसतान (दफनभुमी) साठी उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. सदरची जागा उपलब्ध करुन घेणेसाठी त्या भागातील स. सदस्यांची व नागरीकांची मागणी आहे.

प्रेतांची विल्हेवाट लावण्यासाठी नव्या जागाची तरतुद करणे बाबतची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमा मध्ये कीलम 321 (1) अन्वये खालील प्रमाणे तरतुद आहे.

`` जर प्रेतांची विल्हेवाट लावण्यासाठी असलेल्या विद्यमान जागा अपु-या आहेत असे कोणत्याही वेळी दिसुन आले, तर किंवा कलम 323 च्या तरतुदी अन्वये अशी कोणतीही जागा बंद करण्यात आली असेल तर, आयुक्तांनी महानगरपालिकेच्या मंजुरीने शहरात किंवा शहरा बाहेर उक्त प्रयोजनासाठी अन्य योगय आणि सोयीस्कर जागाची तरतुद केली पाहीजे आणि कलम 321 अन्वये ठेवलेल्या नोंदवहीत त्यांची

नोंदणी करविली पाहिजे आणि अशा रीतीने तरतुद केलेल्या प्रत्येक जागेची नोंदणी करण्याच्या वेळी त्या जागेचे स्थान, मर्यादा व हद्दी दर्शवणारा आणि शह अभियंत्यांची सही असलेला एक नकाशा नगरपालिका कार्यालयात ठेवला पाहीजे ``.

करिता खडकपुरा भागातील दुलेहशाह रहेमाननगर दर्गाह येथील अस्तित्वातील कब्रस्तानच्या शेजारी असलेली सर्व्हे नं. 36 वजिराबाद येथील 03 एकर जागा वक्फ बोर्ड कडून विनामुल्य मिळणेसाठीचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर सादर.

**विषय क्रं. 02**

**विषय :-** अर्जुनसिंध मुकूंदसिंघ चंदन यांना पुर्नवसन कॉलनी गोविंदबाग अबचलनगर येथे वाटप करण्यात आलेले सेक्टर क्रं. 18 मधील प्लॉट क्रं. 14 ऐवजी सेक्टर क्रं. 04 मधील प्लॉट क्रं. 5 व 6 बदलून देणे बाबत.

गुरु-ता-गद्दी त्रिशताब्दी सोहळा-2008 अंतर्गत गुरुव्दारा परिसरत विकासामध्ये श्री अर्जूनसिंघ मुकूंदसिंघ चंदन यांची मालमत्ता संपादन करण्यात येवुन त्यांचे संपादित क्षेत्र 196.60 चौ.मी. च्या मोबदल्यात त्यांना अनुज्ञेय असलेले क्षेत्र 200 चौ.मी. इतके पुनर्वसन कॉलनी गोविंदबाग अबचलनगर येथील सेक्टर क्रं. 18 मधी प्लॉट क्रं. 14 हे मोकळे भुखंड दिनांक 06.12.2006 च्या Provisional Allotment Letter नुसार वाटप करुन भुखंडाचा प्रयत्क्ष ताबा देण्यात आला आहे.

तथापि संबंधीतांनी दिनांक 21.10.2020 च्या अर्जाव्दारे सदर भुखंडाकडे जाणे येणेसाठी कोणताहीच सुविधा उपलब्ध नसल्यामुळे सदर भुखंडावर कसल्याच प्रकारचे विकास करता येत नाही. त्यामळे सदर भुखंडा ऐवजी गोविंदबाग अबचलनगर येथील सेक्टर क्रं. 04 मधील प्लॉट क्रं. 05 बदलून देण्याची विनंती केल्यानुसार उप अभियंता मनपा यांचा अहवाला मागविला असता सेक्टर क्रं. 04 मधील प्लॉट क्रं. 05 हे मोकळे भुखंड असून त्याचे क्षेत्रफळ 128.43 चौ.मी. इतके आहे जे त्यांना अनुज्ञेय होणा-या क्षेत्रापेक्षा 71.57 चौ.मी. क्षेत्राने कमी आहे. तसेच याच भुखंडाला लागून प्लॉट क्रं. 06 हे देखील मोकळे भुखंड असून त्याचे क्षेत्रफळ देखील 128.43 चौ.मी. इतके आहे.

प्लॉट क्रं. 05 व 06 चे एकूण क्षेत्रफळ 156.86 चौ.मी. इतके होत असून जे त्यांना अनुज्ञेय होणा-या क्षेत्रापेक्षा 56.86 चौ.मी. ने जास्त होत असल्याने या कार्यालयाचे पत्र दिनांक 16.04.2021 अन्वये सदर जास्तीचे क्षेत्र 56.86 चौ.मी. ची किंमत स. संचालक नगररचना मनपा नांदेड यांनी एकूण रक्कम रुपये 6,76,991/- निश्चित करुन दिल्यानुसार सदर रक्कमभरणा करण्यास तयार असल्याबाबत समंती पत्र मागविले असता संबंधीतांनी दिनांक 19.04.2021 च्या पत्रान्वये सेक्टर क्रं. 04 मधील प्लॉट क्रं. 05 व 06 चे क्षेत्र एकत्र करुन मोकळे भुखंड वाटप करण्याची विनंती करुन उक्त रक्कम भरण्यास तयार असल्या बाबत समंती दर्शविली आहे.

तरी उक्त प्रकरणी संबंधीताकडून वाढीव क्षेत्राची किमंत रुपये 6,76,991/- भरणा करुन घेऊन त्यांना सेक्टर क्रं. 04 मधील प्लॉट क्रं. 05 व 06 चे एकुण क्षेत्रफळ 256.86 चौ.मी. वाटप करुन सेक्टर क्रं. 18 मधील प्लॉट क्रं. 14 हे मनपाकेच्या ताब्यात घेऊन होणा-या फरबदला बाबत शासनास व भुमी अभिलेख कार्यालयाकडे नोंद घेणेसाठी तसेच पुढील आवश्यकती कार्यवाही होणेसाठी प्रकरण मनपा सर्वसाधारण सभेपुढे निर्णयास्तव सादर.

**विषय क्रं. 03**

**विषय :-** बीएसयुपी योजने अंतर्गत शिल्लक घरकुल नांदेड शहरातील दिव्यांग व्यक्तींना वाटप करणे बाबत.

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यी मध्ये केंद्र व राज्य शासनाच्या बीएसयुपी योजने अंतर्गत पुनर्वसन साईट येथे घरकुल बांधकाम करण्यात आलेले असुन श्रावस्तीनगर साईट क्रं. 34, गोवर्धनघाट व गौतमनगर. सांगवी या ठिकाणी एकूण 260 घरकुल वाटप करणे शिल्लक आहेत. दिव्यांग

कल्याण कायदा-2016 व शासन निर्णय नगरविकास विभाग क्रं. दिव्यांग-2018/प्र.क्र.52/18/नवि-28 दिनांक 10 मे 2018 अनवये घरकुल वाटपामध्ये दिव्यांगांसाठी किमान 5% घरकुल राखीव ठेवण्याबाबत तरतुद आहे. तसेच नांदेड शहरातील दिव्यांग व्यक्तींना घरकुल मागणीसाठी विविध संघटनांनी आंदालने केली आहेत व करीत आहेत.

वरील सर्व बाबींचा विचार करता नांदेड शहरातील सर्व बेघर दिव्यांग व्यक्तींना घरकुल मागणीसाठी मनपाकडे पुरक कागदपत्रासह अर्ज सादरा करण्यासाठी दै. प्रजावाणी या वृतमानपत्राव्दारे दिनांक 28.01.2021 रोजी जाहिर सुचना प्रसिध्द करण्यात आली होती. त्यानुसारअंतिम दिनांकापर्यंत एकूण 803 अर्ज प्राप्त झाले असुन यापुर्वीही 225 दिव्यांग लाभार्थींनी अर्ज सादर केले होते, असे एकूण 1028 अर्ज प्राप्त झाले आहेत. उपलब्ध घरकुलांची संख्या विचारात घेता जास्तीचे घरकुल ागणी अर्ज प्राप्त झाले आहेत सदर अर्जाची छाननी करुन पात्र लाभार्थींची यादी अंतिम करण्यासाठी पात्रतेचे निकष ठरविण्यासाठी शहर अभियंता (PMAY), कार्यकारी अभियंता (BSUP), सहाय्यक आयुक्त (दिव्यांग क, कक्ष), उप अभियंता (PMAY), उप अभियंता (BSUP) यांची समिती स्थापन केली असता या समितीने दिव्यांग व्यक्तींना घरकुल वाटप करण्यासाठी खालील निकषा ठरविण्यासाठी शिफारस केली आहे.

01 दिव्यांग व्यक्ती हा नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीतील रहिवाशी असला पाहिजे, पुरावा दाखल करणे आवश्यक (उदा. आधार कार्ड, मतदान ओळखपत्र, शिधा पत्रिका, विधुत देयक इत्यादी)

02 संबंधीत दिव्यांग लाभार्थी यांचे वार्षिक उत्पन्न हे रु. 3.00 लक्षच्या मर्यादेत असणे आवश्यक आहे. पुराव्यादाखल सक्षम प्राधिकरणाचे उत्पन्नाचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

03 दिव्यांगाचे दिव्यांग प्रमाणपत्र ऑनलाईन असणे आवश्यक आहे. दिव्यांगांनी सादर केलेल्या अर्जा मधील दिव्यांग प्रमाणपत्र मनपाच्या NULM विभागाने तपासणी करुन अहवाल द्यावा.

04 सदर दिव्यांग लाभार्थी कुटूंबाने शासनाच्या इतर घरकुल योजनेचा लाभ घेतलेला नसावा. (शपथपत्र सादर करणे आवश्यक)

05 दिव्यांग लाभार्थी कुटूंबांच्या नावाने भारतात कुठेही स्वत:चे पक्के घर नसावे. (एकत्रित शपथपत्र सादर करणे आवश्यक)

06 लाभार्थी वय 18 वर्षा पेक्षा कमी नसावे.

07 लाभार्थी यांनी बीएसयुपी नियमानुसार घरकुल हिस्सा भरण आवश्यक राहील (10% घरकुल किमंतीच्या)

08 दिव्यांगांना खालील प्रमाणे प्राधान्य देण्यात यावे.

1- नेत्रहीन (दोन्ही नेत्र नसलेले दिव्यांग व्यक्ती)

2- दोन्ही पायांनी दिव्यांग व्यक्ती

3- दोन्ही हातांनी दिव्यांग व्यक्ती.

09 इतर पात्र दिव्यांग व्यक्ती यांना दिव्यांग प्रमाणपत्राच्या टक्केवारीच्या उतरत्या क्रमाणे प्राधान्य देण्यात यावे.

10 सदर दिव्यांग पात्र लाभार्थ्यांना बीएसयुपी योजने अंतर्गत शिल्लक असलेल्या घरकुल मधून 5% प्रमाणे घरकुले वाटप करण्यात यावे.

11 बीएसयुपी योजनेतील शिल्लक घरकुलामध्ये कांही ठिकाणी अज्ञातांकडून तोडफोड झाली असून त्यासाठी कंत्राटदार नियुक्त करुन बीएसयुपी योजनेतुन दुरुस्ती करण्यात यावी.

12 वरील प्रमाणे पात्र यादीतील लाभार्थी संख्या शिल्लक घरकुलांच्या 5% संख्येपेक्षा जासत असल्यास सोडचिठ्ठीव्दारे घरकुल वाटप करण्यात येतील, दिव्यांग प्रमाणपत्र टक्केवारीनुसार व प्रकारानुसार तळ मजला, पहिला मजला, दुसहरा मजला वरील घरकुल वाटपासाठी प्राधान्यक्रम दिला जाईल.

13 शासन निर्णय नगरविकास विभाग क्रं. दिव्यांग-2018/प्र.क्र.52/18/नवि-28 दिनांक 10 मे 2018 अन्वये घरकुल व इतर निधी किमान 5% दिव्यांगासाठी राखीव ठेवणेबाबत आदेश आहेत. सदर शासन निर्णयाप्रमाणे किमान 5% घरकुल देणेसाठी नर्देश असुन 5% पेक्षा जास्त शिल्लक घरकुल असल्यास पात्र दिव्यांगांना देण्याबाबत विचार करण्यात यावा.

करिता वरील प्रमाणे दिव्यांग व्यक्तींना बिएसयुपी योजनेतील शिल्लक घरकुल वाटप करण्याकरिता निकषास मान्यता मिहणेसाठी प्रस्ताव मा. सर्वसाधारण सभेसमोर मान्यतेस्तव सादर.

**विषय क्रं. 04**

**विषय** :- कोवीड-19 अंतर्गत **भक्तीलॉन्स** या ठिकाणी कोविड-19 च्या रुग्णांना ऑक्सीजन पुरवठयाची व्यवस्था करणे.

**संदर्भ** :- सार्वजनिक बांधकाम विभाग नांदेड यांचे कार्यारंभ आदेश क्रं. B-1/24/2020-21 Dt. 18.6.21

जानेवारी-फेब्रुवारी-2021 पासुन भारतात कोरोनाची दुसरी लाट आली असुन त्यमध्ये भारतामध्ये महाराष्ट्रात सर्वात जास्त कोविड-19 रुग्ण वाढत आहेत तसेच नांदेड जिल्हा भारतात पहिला टॉपटेन मध्ये आहे.

नांदेड शहरात कोरोनाचा प्रादुर्भाव वाढल्यामुळे शहरातील शासकीय रुगणालय तसेच खाजगी रुगणालयामध्ये कोरोना रुगण दाखल करुन घेण्यासाठी बेड उपलब्ध होत नाही.

कोविड-19 रुग्णांची वाढती संख्या व अपुरे बेडस पाहता शहरात नविन रुगणालय उघडणे आवश्यक होते. त्यामुळे मा. जिल्हाधिकारी यांनी शहरात नविन रुग्णालय सुर करण्याबाबतच्या सुचना महानगरपालिकेला दिल्या.

शहरात पाहणी केला असता शहराच्या उत्तर भागात तरोडा मध्ये भक्तीलॉन्स हे शहरातील मोठे, नवीन व सुसज्य मंगल कार्यालय असुन त्याठिकाणी तळ मजला व पहिला मजल्यावर अंदाजे 150 ते 200 बेडसचे रुग्णालय होऊ शके. हे तपासल्यानतर सदर ठिकाणी रुगणालय करण्याचे निश्चित केले. तसेच सध्या कोवीड रुगणाना ऑक्सीजनची आवश्यक्ता असल्यामुळे ऑक्सीजन पुरवठयाच्या व्यवस्थेसह रुग्णालय सुरु करण्याचे ठरले.

ऑक्सीजन पुरवठयाचा व्यवस्थेचे काम यापुर्वी सार्वजनिक बांधकाम विभाग नांदेड (म.रा.) यांनी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व शासकीय जिल्हा रुग्णालय या ठिकाणी केले होते. सदर काम New Oxygen Now, Pro. Sujat Baig Mogal, Work shop Nanded यांनी संदर्भीय आदेशान्वये काम केले होते.

भक्तीलॉन्स या ठिकाणी ऑक्सीजन व्यवस्था पुरविण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या बाबींच्या दरानसार व अतिरिक्त 06 बाबींसाठी हातोहात कोटेशन मागवुन कमीत कमी दर घेवुन रुपये 21,40,697/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले.

परंतु शहरात कोविड-19 रुग्णांची दररोजची वाढणारी रुग्ण संख्या शहरातील शासकीय व खाजगी रुगणालयात कमी पडत असलेल्या बेडसची संख्या पाहता भक्तीलॉन्स या ठिकाणी ऑक्सीजन व्यवस्था पुरविण्यासाठी वरील अंदाजपत्रकानुसार निविदा मागवुन काम हाती घेणे शक्य नाही. दररोजची वाढती कोविड-19 ची रुग्ण संख्या पाहता सदर काम तात्काळ हाती घेणे आवश्यक आहे.

आणिबाणी व तातडीच्या वेळेस काम करण्याचे झाल्यास महाराष्ट्र महानगरपालिक अधिनियम मध्ये खालील प्रमाणे तरतुद आहे.

कलम 67 क नुसार आयुक्तांने `` **कोणत्याही आणीबाणीच्या परिस्थितीत जनतेच्या सेवेसाठी किंवा सुरक्षिततेसाठी किंवा महानपगरपालिकेच्या मालमत्तेच्या संरक्षणासाठी अशा आणीबाणीच्या परिस्थितीमुळे त्यास समर्थनीय किंवा आवश्यक वाटेल अशी तातडीची कार्यवाही त्यास या अधिनियमान्वये दस-या एखाद्या नगरपालिका प्राधिका-यांच्या किंवा राज्य शासनाच्या मंजुरी, मान्यता किंवा प्राधिकाराशिवाय करता**

**येत नसली तरीही अशी कार्यवाही केली पाहिजे. परंतु आयुक्तांने त्याने केलेली कार्यवाही, त्याबाबतची कारणे आणि या अधिनियमाच्या तरतुदीन्वये चालु अर्थसंकल्पीय अनुदानात समाविष्ट नसलेला जो कोणताही खर्च अशा कार्यवाहीमुळे झाला असेल किंवा होण्याचा संभव असेल तो खर्च याविषयीचे प्रतिवृत्त स्थायी समिती व महानगरपालिका यांचेकडे ताबडतोब पाठविले पाहिजे ``.**

करीता भक्तीलॉन्स या ठिकाणी ऑक्सीजन पुरवण्याची व्यवस्था करण्यासाठी महानगरपालिका अधिनियम 67 (क) अन्वये संदर्भ क्रं. 1 च्या दरानुसार New Oxygen Now, Pro. Sujat Baig Mogal, Work shop Nanded यांचे कडून काम करुन घेण्यासाठी अंदाजपत्रकीय किमंत रुपये 21,40,697/- (एकवीस लक्ष चाळीस हजार सहाशे सत्यान्नव फक्त) या रक्कमेस प्रशासकीय व आर्थीक मान्यता प्रदान करण्यात येते.

तसेच यावर होणारा खर्च कोविड-19 अंतर्गत राज्य आपत्ती प्रतिसाद निधी (SDRF) नांदेड यांचेकडून प्राप्त झालेल्या निधीतुन करण्यात यावा. सदरच आदेशाची माहिती मनपा सर्वसाधारण सभेसमोर सादर.

**विषय क्रं. 05**

**विषय** :- कोवीड-19 अंतर्गत **हैदरबाग मनपा दवाखाना** या ठिकाणी कोविड-19 च्या रुग्णांना ऑक्सीजन पुरवठयाची व्यवस्था करणे.

**संदर्भ** :- सार्वजनिक बांधकाम विभाग नांदेड यांचे कार्यारंभ आदेश क्रं. B-1/24/2020-21 Dt. 18.6.21

जानेवारी-फेब्रुवारी-2021 पासुन भारतात कोरोनाची दुसरी लाट आली असुन त्यमध्ये भारतामध्ये महाराष्ट्रात सर्वात जास्त कोविड-19 रुग्ण वाढत आहेत तसेच नांदेड जिल्हा भारतात पहिला टॉपटेन मध्ये आहे.

नांदेड शहरात कोरोनाचा प्रादुर्भाव वाढल्यामुळे शहरातील शासकीय रुगणालय तसेच खाजगी रुगणालयामध्ये कोरोना रुगण दाखल करुन घेण्यासाठी बेड उपलब्ध होत नाही.

कोविड-19 रुग्णांची वाढती संख्या व अपुरे बेडस पाहता शहरात नविन रुगणालय उघडणे आवश्यक होते. त्यामुळे मा. जिल्हाधिकारी यांनी शहरात नविन रुग्णालय सुर करण्याबाबतच्या सुचना महानगरपालिकेला दिल्या.

शहरात पाहणी केला असता शहराच्या उत्तर भागात तरोडा मध्ये भक्तीलॉन्स हे शहरातील मोठे, नवीन व सुसज्य मंगल कार्यालय असुन त्याठिकाणी तळ मजला व पहिला मजल्यावर अंदाजे 35 ते 40 बेडसचे रुग्णालय होऊ शक्ते. हे तपासल्यानतर सदर ठिकाणी रुगणालय करण्याचे निश्चित केले. तसेच सध्या कोवीड रुगणाना ऑक्सीजनची आवश्यक्ता असल्यामुळे ऑक्सीजन पुरवठयाच्या व्यवस्थेसह रुग्णालय सुरु करण्याचे ठरले.

ऑक्सीजन पुरवठयाचा व्यवस्थेचे काम यापुर्वी सार्वजनिक बांधकाम विभाग नांदेड (म.रा.) यांनी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व शासकीय जिल्हा रुग्णालय या ठिकाणी केले होते. सदर काम New Oxygen Now, Pro. Sujat Baig Mogal, Work shop Nanded यांनी संदर्भीय आदेशान्वये काम केले होते.

हैदरबाग मनपा दवाखाना या ठिकाणी ऑक्सीजन व्यवस्था पुरविण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या बाबींच्या दरानसार व अतिरिक्त 06 बाबींसाठी हातोहात को‍ोटेशन मागवुन कमीत कमी दर घेवुन रुपये 5,30,142/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले.

परंतु शहरात कोविड-19 रुग्णांची दररोजची वाढणारी रुग्ण संख्या शहरातील शासकीय व खाजगी रुगणालयात कमी पडत असलेल्या बेडसची संख्या पाहता भक्तीलॉन्स या ठिकाणी ऑक्सीजन व्यवस्था पुरविण्यासाठी वरील अंदाजपत्रकानुसार निविदा मागवुन काम हाती घेणे शक्य नाही. दररोजची वाढती कोविड-19 ची रुग्ण संख्या पाहता सदर काम तात्काळ हाती घेणे आवश्यक आहे.

आणिबाणी व तातडीच्या वेळेस काम करण्याचे झाल्यास महाराष्ट्र महानगरपालिक अधिनियम मध्ये खालील प्रमाणे तरतुद आहे.

कलम 67 क नुसार आयुक्तांने `` **कोणत्याही आणीबाणीच्या परिस्थितीत जनतेच्या सेवेसाठी किंवा सुरक्षिततेसाठी किंवा महानपगरपालिकेच्या मालमत्तेच्या संरक्षणासाठी अशा आणीबाणीच्या परिस्थितीमुळे त्यास समर्थनीय किंवा आवश्यक वाटेल अशी तातडीची कार्यवाही त्यास या अधिनियमान्वये दस-या एखाद्या नगरपालिका प्राधिका-यांच्या किंवा राज्य शासनाच्या मंजुरी, मान्यता किंवा प्राधिकाराशिवाय करता येत नसली तरीही अशी कार्यवाही केली पाहिजे. परंतु आयुक्तांने त्याने केलेली कार्यवाही, त्याबाबतची कारणे आणि या अधिनियमाच्या तरतुदीन्वये चालु अर्थसंकल्पीय अनुदानात समाविष्ट नसलेला जो कोणताही खर्च अशा कार्यवाहीमुळे झाला असेल किंवा होण्याचा संभव असेल तो खर्च याविषयीचे प्रतिवृत्त स्थायी समिती व महानगरपालिका यांचेकडे ताबडतोब पाठविले पाहिजे ``.**

करीता भक्तीलॉन्स या ठिकाणी ऑक्सीजन पुरवण्याची व्यवस्था करण्यासाठी महानगरपालिका अधिनियम 67 (क) अन्वये संदर्भ क्रं. 1 च्या दरानुसार New Oxygen Now, Pro. Sujat Baig Mogal, Work shop Nanded यांचे कडून काम करुन घेण्यासाठी अंदाजपत्रकीय किमंत रुपये 5,30,142/- (एकवीस लक्ष चाळीस हजार सहाशे सत्यान्नव फक्त) या रक्कमेस प्रशासकीय व आर्थीक मान्यता प्रदान करण्यात येते.

तसेच यावर होणारा खर्च कोविड-19 अंतर्गत राज्य आपत्ती प्रतिसाद निधी (SDRF) नांदेड यांचेकडून प्राप्त झालेल्या निधीतुन करण्यात यावा. सदरच आदेशाची माहिती मनपा सर्वसाधारण सभेसमोर सादर.

**विषय क्रं. 06**

**विषय** :- नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीतील विविध कोविड कंटेनमेंट झोन करीता बॅरीकेड लावणे व काढणे बाबत रुपये 10,00,000/-.

प्रशासकिय आर्थीक मंजुरी आदेश क्रं. नावाशमनपा/साबांवि/3571/21 दिनांक 29.07.2020 अन्वये नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीतील विविध **कोविड कंटेनमेंट झोन करीता बॅरीकेड लावणे व काढणेसाठी कामाची** तातडी लक्षात घेता सदरी कामे **श्री सहयोग सेवा नांदेड** यांच्याकडून लाकडी बॅरीकेटींग लावणे व काढणे कामास मान्यता झाल्या प्रमाणे रुपये 10,00,000/- (अक्षरी रुपये दहा लक्ष फक्त) यास महाराष्ट्र महानरपालिका अधिनियम 1949 चे कलम 73 (क) व (ड) चे प्राप्त अधिकारानुसार प्रशासकीय व आर्थीक मान्यता प्रदान करण्या आली त्यास मान्यतेस्तव मनपा सर्वसाधारण सभे समोर सादर.

यावर होणारा खर्च सालसन 2020-21 च्या अंदाजपत्रकातील नांदेड वाघाळा शहर महानगपवालिका नांदेड कोविड-19 च्या प्राप्त अनुदानाच्या या लेखाशिर्षकाखालील तरतुदीतुन करण्यात यावा.

**विषय क्रं. 07**

**विषय** :- नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीतील विविध कोविड कंटेनमेंट झोन करीता बॅरीकेड लावणे व काढणे बाबत रुपये 5,00,000/-.

प्रशासकिय व आर्थीक मंजुरी आदेश क्रं. नावाशमनपा/साबांवि/5925/21 दिनांक 21.09.2020 अन्वये नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीतील विविध **कोविड कंटेनमेंट झोन करीता बॅरीकेड लावणे व काढणेसाठी कामाची** तातडी लक्षात घेता सदर काम **श्री सहयोग सेवा नांदेड** यांच्याकडून लाकडी बॅरीकेटींग लावणे व काढणे कामास मान्यता झाल्या प्रमाणे रुपये 5,00,000/- (अक्षरी रुपये पांच लक्ष फक्त) यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 73(क) व (ड) अन्वये प्राप्त अधिकारानुसार प्रशासकीय व आर्थीक मान्यता प्रदान करण्यात आली त्यास मान्यतेस्तव मनपा सर्वसाधारण सभे समोर सादर.

यावर होणारा खर्च सालसन 2020-21 च्या अंदाजपत्रकातील नांदेड वाघाळा शहर महानगपवालिका नांदेड कोविड-19 च्या प्राप्त अनुदानाच्या या लेखाशिर्षकाखालील तरतुदीतुन करण्यात यावा.

**विषय क्रं. 08**

**विषय** :- कोव्हिड-19 करीता कोव्हिड केअर सेंटर उघडणे, कोव्हिड-19 तपासणी करिता नाना-नानी पार्क येथे सेंटर उघडणे व गुरुव्दारा परिसरात साथ रोग जास्त पसरल्यामुळे परिसर प्रतिबंधीत करणे व आवश्यकत्या ठिकाणी बैरीगेटींग करणे बाबत

प्रशासकिय व आर्थीक मंजुरी आदेश क्रं. नावाशमनपा/कोव्हिड-19/13476/21 दि. 31.03.21 अन्वये सध्या जगभ्रात पसरलेल्या कोरोणा विषाणूची लागण राज्यात झालेली आहेत. सदर रोगाचा प्रसार टाळण्यासाठी शासनाने राज्यभर अनेक प्रतिबधात्मक उपाययोजना लागू केले आहेत. त्या दृष्टीने राज्य शासनाने कारोनाव्हायरस या प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथ रोगप्रतिबंधात्मक कायदा 1897 दिनांक 14 मार्च 2020 पासून लागु करुन खंड 2,3 व 4 मधील तरतुदीनुसार अधिसूचना निर्गमित केले आहे.

या बाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम 67(3) क नुसार कोणत्याही आणीबाणीच्या परिस्थितीत जनतेच्या सेवेसाठी किंवा सुरक्षेसाठी किंवा महानगरपालिकेच्या संरक्षणासाठी अशा आणीबाणीच्या परिस्थितीमुळे त्यास समर्थ्ंनिय किंवा आवश्यक वाटेल अशी तातडीची कार्यवाही त्यास या अधिनियमान्वये दुस-या एखादया नगरपालिका प्राधिकरणाच्या किंवा राज्य शासनाच्या मंजुरी मान्यता किंवा प्राधिकरण शिवाय करता येत नसली तरी तरीही ही अशी कार्यवाही केली पाहिजे. परंतु आयुक्तांनी त्यांनी केलेली कार्यवाही त्याबाबतची कारणे आणि या अधिनियमाच्या तरतुदीन्वये चालू अर्थसंकल्पीय अनुदानात समाविष्ट नसलेल्या जो कोणताही खर्च अशा कार्यवाहीमुळे झाला असेल किंवा होणास-या संभव असेल तो खर्च या विषयाचे प्रतिवृत्त स्थायी समिती व महानगरपालिका यांच्याकडे कताबडतोब पाठविले पाहिजे.

नांदेड महानगरपालिका परिसरात साथ रोगाचा प्रसार वाढल्याने तातडीने कोव्हिड-19 करिता सी.सी. सेंटर उघडणे आवश्यकय असल्याने त्या ठिकाणी बेरीगेटींग व पत्रे ठोकून क्षेत्र प्रतिबंधीत करण्यात आले तसेच कोव्हिड-19 ची चाचणी करण्याकरिता तात्पुरते शेड उभारण्यात आले असून गुरुव्दारा परिसरात साथ रोग जास्त प्रमाणात पसरल्याने गुरुव्दारा परिसरात प्रतिबंधीत करण्या करिता जाळया व बेरीगेटींग करण्यात आले व इतर शहरातील आवश्यक त्या ठिकाणी बेरीगेटींग करणे आवश्यक असल्याने **श्री सहयोग सेवा नांदेड** यांच्याकडून तातडीने करुन घेण्यात आल्याने त्यांनी सादर केलेल्या देयकानुसार रुपये 70,10,369/- (अक्षरी रुपये सत्तर लाख दहा हजार तीनशे एकोणसत्तर रुपये) रक्कम देण्यास मान्यता देण्यात येते व झालेल्या खर्चास प्रशासकीय व आर्थीक मान्यता देण्यात येते तसेच कोव्हिड-19 अनुदान/14वा वित्त आयोगाच्या निधीच्या व्याजामधून अथवा मा. जिल्हाधिकारी कडून प्राप्त निधीतून श्री सहयोग सेवा नांदेड यांचे नांवे अदाई करण्यास मान्यता देण्यात आली त्यास मान्यतेस्तव मनपा सर्वसाधारण सभेसमोर सादर.

**<u>स. सदस्या मार्फत आलेले प्रस्ताव/सुचना</u>**

**विषय क्रं. 09** **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीत बुध्द विहार, समाज मंदिर, अण्णाभाऊ साठे समाज मंदिर, राष्ट्रीय संत रविदास समाज मंदिर व इतर अनुसूचित जातीच्या समाज मंदिरात सोई सुविधा उपलबध करुन देणे जसे की, एलईडी प्रोजेक्टर, सोलार ऊर्जा उपकरणे, साऊंड सिस्टिम फर्निचर आणि योजनेतुन घेता येईल असे उपकरणे समाजकल्याण विभागाच्या अनुसूचित जाती उपाययोजना अंतर्गत नाविन्यपूर्ण योजनेतून लाभ मिळवून देण्यासाठी मनपाच्या सहा क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत नोंद असलेले बुध्दी विहार, समाज मंदिर यांची मोजदाद करण्यात यावी.

ज्या प्रभागात नोंदणी केल्या नाहीत त्यांची क्षेत्रीय कार्यालय स्तरावर नोंद करुन मनपाला अहवाल देण्यात यावा.  नोंद घेण्याची कार्यवाई पूर्ण झाल्यानंतर संबंधित बुध्दी विहार, समाज मंदिर यांना कोणकोणती उपकरणे लागणार आहेत याची माहिती घेऊन मनपाकेने जिल्हाधिकारी कार्यालय व सहाय्यक आयुक्त समाजकल्याण विभाग कार्यालय यांचेकडे रीतसर प्रस्ताव पाठवुन उपकरणाची मागणी करावी. असा प्रस्ताव ही सर्वसाधारण सभा सर्वानुमते समंत करीत असून ता याच सभेत मंजूर करण्यात येत आहे. पुढील कार्यवाही मनपा प्रशासनाने करावी.

**सुचक** :- बापूराव गजभारे  **अनुमोदक** :- दयानंद वाघमारे

**स्वाक्षरीत/-**
**(स. अजीतपालसिंघ संधु)**
**नगरसचिव**
**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड**